بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحْمَدُہٗ وَنُصَلِّی عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡد
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع گورداسپور (پنجاب)

# हजरत अबु सलमाः, हजरत अब्दुल्लाह बिन अनीस आणि रजीअ या मोहिमांच्या प्रकाशात पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आदर्श आणि श्रद्धावर्धक प्रसंगवर्णन

**तसेच तुरुंगात अडकलेले आणि पॅलेस्टीनच्या अत्याचारग्रस्त लोकांसाठी प्रार्थनेचे आवाहन.**

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १० मे २०२४, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔ بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह अल-फातिहा च्या पठणानंतर, हुजूर अनवर म्हणाले: आज मी पवित्र प्रेषित (स.) च्या काळातील काही घटनांचा उल्लेख करेन. या संदर्भात, प्रथम बनू असद टोळीचे खोडकरवृत्ती आणि अबू सलमाःच्या सिरया(युद्ध मोहिम)चा उल्लेख केला जाईल, ज्यामध्ये पवित्र पैगंबर (स.) सहभागी झाले नव्हते, परंतु ते इतरांना युद्धात पाठवत असत. यातून त्यांचे व्यक्तिमत्तवा मधील काही पैलू, त्यांची विवेकबुद्धी, मुस्लिमांच्या संरक्षणाची पद्धत आणि शत्रूबद्दल सहानुभूती व्यक्तची जाणीव होते.

सरिया अबु सलमाः (र.ज.) मोहरम ४ हिजरी मध्ये पवित्र पैगंबर मुहम्मद (स.)चे चुलत भाऊ आणि आणि हजरत हमजा (र.ज.) चे पाळक भाऊ होते जो बद्र आणि उहूद युद्धांमध्ये देखील सामील होते. या सिरियेची पार्श्वभूमी अशी आहे की, उहूदच्या युद्धाच्या परिस्थितीमुळे, मदीनेमध्ये राहणारे ढोंगी, ज्यू आणि मदिनाच्या आसपास राहणारे जमाती देखील लवकरच मुस्लिमांचा नायनाट करू शकतात असा विचार करू लागले म्हणून, सर्वप्रथम, बनू असद बिन खुजैमाच्या टोळीने मुस्लिमांवर हल्ला करण्याचा कट रचला, या टोळीचा प्रमुख, तलिहा बिन खुवैलद आणि त्यांचा भाऊ सलमा यांनी लोकांना एकत्र केले आणि सैन्य तयार केले. बनू असदचा एक माणूस, कायस बिन हरीथ बिन उमेर याने आपल्या लोकांना मुस्लिमांवर हल्ला न करण्याचा सल्ला दिला, जेव्हा या हल्ल्याची बातमी

पवित्र प्रेषित (स.) पर्यंत पोहोचली तेव्हा त्यांनी ठरवले की त्यांच्या हल्ल्यापूर्वी मुस्लिमांनी स्वतःच्या प्रदेशाचे रक्षण करण्याकरिता त्यांच्यावर चढाई करावी. म्हणून १५० साथीदारांची फौज घेऊन त्यांनी हल्ला केला.

हे लष्कर, आपली मोहीम गुप्त ठेवत, चार दिवसांच्या प्रवासानंतर, कतन पर्वताजवळील बनू असद बिन खजैमाच्या झऱ्यापाशी पोहोचले, आणि तेथे पोहोचताच त्यांनी हल्ला करून त्यांची गुरे ताब्यात घेतली आणि त्यांच्या तीन मेंढपाळांना ताब्यात घेतले, आणि बाकीचे पळून गेले. या पळून गेलेल्यांनी, बनू असदला हल्ल्याची माहिती देताना, अतिशयोक्तीपूर्ण वागणूक दिली आणि मुस्लिम सैन्याच्या संख्येत अतिशयोक्ती केली, ज्यामुळे बनू असद घाबरले आणि पळून गेले. हजरत अबू सलमाः यांनी आपल्या साथीदारांना त्यांच्या शोधात पाठवले पण मुस्लिमांचा कोणाशीही सामना झाला नाही. हजरत सलमाः यांनी युद्धधन मधील पाचवा भाग पवित्र पैगंबर (स.) यांच्यासाठी राखीव ठेवला आणि बाकीची मालमत्ता सोबतींमध्ये वितरित केली. हजरत अबु सलमाः (र.ज.) यांच्या मृत्युबद्दल एक कथा प्रसिद्ध आहे की जेव्हा ते मदिना परतले तेव्हा ओहदच्या युद्धात त्यांना लागलेला मार पुन्हा इजा देऊ लागला आणि मरेपर्यंत ते त्या दुखापतीमध्ये राहिले आणि शेवटी ३ जमादीउल अव्वल मध्ये त्यांचा निधन झाला.

बनू असदचा प्रमुख, तुलैहा बिन खुवयलिद, ज्याचा उल्लेख केला गेला आहे, तो नंतर मुस्लिम झाला, परंतु नंतर धर्मत्यागी झाला, उलट, तो प्रेषितत्वाचा खोटा दावेदार बनला आणि त्याने देशद्रोह आणि दंगली घडवून आणल्या, परंतु तो अपयशी ठरला आणि अरबस्तानात पळून गेला आणि नंतर काही काळ पश्चात्ताप केला आणि इस्लामिक युद्धांमध्ये भाग घेतला आणि २१ हिजरीमध्ये एका युद्धात शहीदचा दर्जा मिळाला. अल्लाहने त्याचा शेवट चांगला करण्याचा ठरवलं होता, म्हणून त्याने पुन्हा इस्लामचा स्वीकार केला.

यानंतर हजरत अब्दुल्ला बिन अनिस (र.ज.) मोहिम चा उल्लेख आहे. हजरत अब्दुल्ला बिन अनिस (र.ज.) यांनी उकबा सानिया दीक्षामध्ये, बद्र, उहुद आणि इतर लढायांमध्ये सामील होते. ५४ हिजरीमध्ये सीरियामध्ये त्यांचा मृत्यू झाला किंवा काही परंपरेनुसार ७४ हिजरी मध्ये त्यांचा निधन झाला. हजरत मिर्झा बशीर

अहमद साहब यांनी मोहरम ४ हिजरीमध्ये या मोहिमेच्या तपशीलात लिहिले आहे की कुरैशांची बंडखोरपणा आणि उहदमध्ये मुस्लिमांचे तात्पुरते नुकसान आता वेगाने घातक परिणाम प्रदर्शित करत होते. म्हणून, ज्या दिवसांत बनू असद मदीनावर हल्ला करण्याच्या तयारीत होते, त्याच दिवसांत पैगंबर (स.) यांना माहिती मिळाली की बनु लहियान जमातीचे लोक, त्यांचे प्रमुख सुफयान बिन खालिद यांच्या प्रेरणेवरून, त्यांच्या जन्मभूमी उरना येथे जो मक्केजवळचा एक स्थान होता, खूप मोठे सैन्य गोळा करून मदीनावर हल्ला करण्याच्या तयारीत होते.

पैगंबर साहेब, ज्यांना खूप संधीसाधू आणि विविध अरब जमातींची स्थिती आणि त्यांच्या प्रमुखांची शक्ती आणि प्रभाव याची चांगली जाणीव होती, त्यांना ही बातमी मिळताच समजले की हा सर्व उपद्रव आणि देशद्रोह बनुलहिनचा प्रमुख सुफयान बिन खालिदचा आहे. आणि जर त्याचा अस्तित्व नसता तर बनु लहियान मदीनावर हल्ला करण्याचे धाडस करू शकत नाहीत. पवित्र पैगंबर (स.) यांना हे देखील माहित होते की या टोळीतील कोणीही प्रभावशाली व्यक्ती नाही जो या प्रकारच्या चळवळीचा नेता होऊ शकेल. त्यामुळे लष्करी तुकड्या पाठवून गरीब मुस्लिमांना त्रास सहन करावा लागेल आणि देशात आणखी रक्तपात होण्याची दारे खुले होतील, अशी शक्यता लक्षात घेऊन एका व्यक्तीने जाऊन या व्यक्तिला आणि उपद्रवच्या उगमस्त्रोताला शोधून त्यास कत्तल करण्याचा हुकूम दिला. म्हणून त्यांनी अब्दुल्ला बिन अनीस अन्सारीला या कामासाठी पाठवले, त्यामुळे अब्दुल्ला बिन अनीस अत्यंत सावधपणे त्यांच्या तंबूत शिरले जिथे सुफियान मदीनावर हल्ला करण्याच्या तयारीत व्यस्त होता आणि रात्रीच्या वेळी सुफयानवर हल्ला करण्याची संधी साधली आणि त्याला ठार मारले. ही बाब बानुल्हियान यांना कळताच त्यांनी अब्दुल्लाचा पाठलाग केला, मात्र ते यशस्वीपणे तिथून बाहेर पळाले.

जेव्हा अब्दुल्ला बिन अनैस पैगंबराकडे आले, तेव्हा प्रेषितांनी त्याचे स्वरूप पाहिले आणि ओळखले की ते यशस्वी झाले आहे, म्हणून, त्याना पाहून, पैगंबर म्हणाले: उद्देशपूर्ण झालेला आहे असा दिसतो. अब्दुल्ला (र.ज) म्हणाले हो हुजूर अल्लाह आणि त्याचा रसूल विजयी झाले. त्या वेळी, पवित्र प्रेषित (स.) यांनी अब्दुल्लाला बक्षीस काठी दिले आणि म्हणाले, ‘‘हे काठी तुम्हाला स्वर्गात झुकण्यास मदत करेल.’’ अब्दुल्ला (र.ज.) ने या आशीर्वादित काठीला मोठ्या

प्रेमाने आणि प्रामाणिकपणाने ठेवले आणि त्यांना त्यांच्याबरोबर दफन केले जावे अशी इच्छा व्यक्त केली.

अब्दुल्ला (र.ज) परत आल्यावर पवित्र प्रेषित (स.) च्या आनंदातून आणि त्यांनी त्यांना असामान्य मार्गाने दिलेल्या बक्षीसातून, हे स्पष्ट होते की सुफयान बिन खालिदचे उपद्रव अत्यंत धोकादायक होते ज्यांनी त्यांना जाणीव होती आणि त्यांनी त्याची हत्या सार्वजनिक शांतता राखण्यासाठी केली. पण विरोधी याप्रसंगातून पवित्र पैगंबर स. यांच्यावर आळ लावतात की त्यांनी शांतता नष्ट केली अणि मानवी जीवनाचा खून केला,(ईश्वर क्षमा करो) ते लोक हे पाहत नाहीत की त्यांनी विरोधी लोकांची देखील किती परवाह होती की त्यांचे जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी जो की युद्धप्रसंगी मारले गेले असते, केवळ एक व्यक्तिला ठार मारण्याचे ठरविले, जेणे करून बाकींचे प्राण वाचवले जावे. ही आहे अस्सल दया आणि करूणा. आजचे तथाकथित जग काही लोकांना मारण्याच्या बहाण्याने निरपराध मुलांचे, स्त्रिया आणि वृद्धांचे रक्त सांडत आहे आणि निर्लज्जपणे सांगतात की हे तर युद्धाचे पडसाद आहे. पवित्र पैगंबर (स.) तर युद्धावेळी सरळ म्हणत असे की, युद्धादरम्यान मूल, वृद्ध, स्त्री आणि धार्मिक व्यक्ती जी युद्धात थेट सहभागी होत नाहीत, ठार मारणे वर्ज्य आहे. तर ही मुहम्मद साहेबांचे आदर्श आणि इस्लामी शिकवण.

त्यानंतर हुजूर अन्वर यांनी सिरया रजीअ चा उल्लेख केला आणि सांगितले की, त्याचे वर्णन मोठे आहे, त्यामुळे आज मी त्याचा काही भाग सादर करणार आहे. आमच्या रिसर्च सेलने सिरया रजीअच्या संदर्भात एक टीप दिली आहे आणि हे लक्षात घेण्यासारखे आहे की काही तारखांमध्ये फरक आढळतो. बहुतेक चरित्रकारांनी सफर ४ हिजरी ची तारीख लिहिली आहे आणि त्याचे वर्णन अशा प्रकारे केले आहे की हजरत खबीब आणि हजरत जैद यांना मक्केत विकले गेले होते, परंतु पवित्र महिना सुरू झाल्यामुळे, मक्केतील लोकांनी त्यांना कैद केले आणि जेव्हा पवित्र महिने संपले, तेव्हा त्या दोघांना ठार मारले. जर हा सिरया सफ़र ४ हिजरी मध्ये झाले असे मानले तर पवित्र महिने सुरु झाले असे म्हणणे अधिक अयोग्य वाटते म्हणून हिजरी ४ पेक्षा ३ हिजरीच्या शेवटच्या दिवसात झाले असे म्हणणे जास्त रास्त आहे. हजरत खबीब आणि हजरत जैद शहीद झाले आणि

जेव्हा त्यांच्या हौतात्म्याची बातमी मदीनाला पोहोचली तेव्हा हा इतिहास हळूहळू परंपरांमध्ये रूढ झाला. तथापि, अल्लाहच सर्वज्ञ आहे.

या मालिकेबद्दल असे लिहिले आहे की बनू लिह्यानच्या प्रमुखाच्या हत्येमुळे, ही टोळी बदलाच्या आगीत जळत होती आणि मुस्लिमांकडून बदला घेण्याचा विचार करत होती, म्हणून सुनियोजित होऊन अजल आणि क़ारत टोळीचे काही लोक पवित्र प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या सेवेत आले आणि म्हणाले की आमच्या जमातीत इस्लामला खूप प्रतिष्ठा आहे, म्हणून तुम्ही तुमच्या काही लोकांना आमच्याबरोबर पाठवा जे तेथे इस्लामचे आमंत्रण देण्याचे काम बजावतील. पवित्र पैगंबर (स) यांनी त्यांच्याबरोबर काहीं मुस्लिम पाठवले. चरित्राच्या बहुतेक पुस्तकांमध्ये १० साथीदारांचा उल्लेख आहे, परंतु केवळ ७ साथीदारांची नावे आढळतात. पवित्र पैगंबरांनी आसीम बिन साबित किंवा मरसद बिन अबी मरसद यांना अमीर केले होते. याची पुढील तपशील मी पुढच्या प्रवचनात करेन. इन्शाल्लाह.

शुक्रवारच्या प्रवचनाच्या शेवटी, हुजूर अनवर म्हणालेःआज मी पुन्हा येमेनच्या बंदिवानांसाठी प्रार्थना करण्यास आवाहन करतो, विशेषतः त्या महिलेसाठी जी सदर लजना आहे आणि त्यांना अत्यंत हलाखीच्या अवस्थेत ठेवण्यात आले आहे. आणि काही इतर जे त्याच्या आज्ञा पाळण्यास तयार नाहीत त्यांनाही कैद केले जात आहे. त्यांच्यासाठी विशेष प्रार्थना करा की ते लवकर या कैदीतून बाहेर होवो.

तसेच पाकिस्तानच्या कैद्यांच्या सुटकेसाठी, पॅलेस्टाईनच्या लोकांसाठी प्रार्थना करत राहा. परिस्थिती चांगल्या होताना दिसतात पण नंतर त्या पुन्हा बिघडतात. इस्रायली सरकार हट्टी स्वाभावान वागत आहे. सर्वशक्तिमान अल्लाह त्यांना त्यांच्या जुलमातून लवकर मुक्त करो आणि मुस्लिमांना त्यांचे हक्क बजावण्याचे सामर्थ्य देवो. आमीन

اَلْحَمْدُ لِلّٰہِ ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا
مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ. عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہ
اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ
یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ ۔